NUMBERS DON'T LIE!

DATA & PSYCHOLOGY FOR WINNING TRADES

(मराठी आवृत्ती)

by

SHUBHAM BHOSALE
(Mentor & CEO Trading Universe)

लेखक परिचय

नमस्कार मित्रांनो,

मी शुभम विठ्ठल भोसले. माझं वय सध्या २४ वर्षे आहे, आणि माझा प्रवास शेअर मार्केटच्या जगात २०१९ पासून सुरू झाला. शालेय जीवनातच मला आर्थिक बाजारात रस वाटू लागला, आणि बारावीत असताना मी या क्षेत्रात पदार्पण केलं. त्यानंतर एक अनपेक्षित घटना घडली – कोरोना व्हायरसच्या महामारीमुळे लॉकडाउन लागला आणि माझं कॉलेज पूर्णपणे ऑनलाइन झालं. या काळात मला पूर्ण वेळ ट्रेडिंग करण्याची संधी मिळाली, आणि या मार्गावर पाऊल ठेवून मी स्वतःला इम्प्रूव करणं सुरू केलं. सुरुवातीच्या तीन वर्षांमध्ये मी अनेक अनुभव घेतले, चुका केल्या, आणि प्रत्येक दिवशी काहीतरी नवीन शिकत गेलो.

ट्रेडिंगच्या क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी, खूप मेहनत, समर्पण, आणि योग्य मानसिकता आवश्यक आहे. मला सुरुवातीला कुठलेही मार्गदर्शन नाही, त्यामुळे माझ्या अनुभवानेच मला मार्ग दाखवला. या तीन वर्षांच्या कालावधीत मी शिकलेलं आणि अनुभवलेलं माझ्या स्वतःच्या जडणघडणीचा भाग बनला. पण एक गोष्ट मात्र मला कायम जाणवली – योग्य मार्गदर्शन न मिळाल्यामुळे मला वेळ आणि प्रयत्न खर्च करावे लागले. जर सुरुवातीलाच योग्य मार्गदर्शन मिळालं असतं, तर मला यशाच्या दिशेने अधिक जलद गती मिळाली असती.

या पुस्तकाच्या माध्यमातून, मी माझ्या अनुभवांबद्दल आणि जे काही शिकलो, ते तुमच्याशी शेअर करत आहे. यामध्ये तुम्हाला तुमच्या ट्रेडिंगमध्ये प्रगती करण्यासाठी मदत मिळेल. मी “Trading Universe” या माझ्या शिक्षण आणि मार्गदर्शनाच्या प्लॅटफॉर्मवर तुमचं स्वागत करत आहे. येथे तुम्हाला योग्य मार्गदर्शन, ज्ञान मिळेल ज्यांच्या सहाय्याने तुम्ही तुमच्या ट्रेडिंग प्रवासात यशस्वी होऊ शकता.

प्रारंभ

या पुस्तकामध्ये असे तुम्हाला महत्वपूर्ण महिती आणि काही ट्रेडिंग टास्क सांगितलेले आहेत आणि दिलेल्या ट्रेडिंग टास्कचे पालन केल्यास, तुम्ही तुमच्या ट्रेडिंग जर्नीमध्ये महत्त्वपूर्ण बदल घडवू शकता. हे टास्क पूर्ण करणे सर्वांसाठी सोपे आहे, फक्त मार्केटमधून प्रॉफिट मिळवण्याची इच्छा असावी, तसच त्यासाठी प्रामाणिकपणे मेहनत करण्याची जिद्द पाहिजे. प्रॉफिट तर प्रत्येकालाच हवा असतो, पण त्यासाठीची आवड आणि निष्ठा काहींनाच असते.

ट्रेडिंगचा नाद असणे म्हणजे सतत ट्रेडिंग करत बसणे असं नाही. हे मूर्खपणाचे ठरेल. "नाद" म्हणजे आपली सदसद्विवेकबुद्धी वापरून, थोडा वेळ काम करून स्मार्ट वर्क पद्धतीने बिझनेस चालवणे.

आपण अनेक लोकांचे उदाहरण ऐकतो ज्यांनी शेअर मार्केटमध्ये कोट्यवधी रुपयांचे नुकसान केलेले असते. पण हे पैसे अनेक लोकांनी योग्य शिक्षण न घेता, फक्त कमी वेळात जास्त पैसे कमवण्याच्या लालसेमध्ये गमावले आहेत. जर आपण २०,००० रुपये असलेल्या आपल्या ट्रेडिंग कॅपिटलवर एका महिना किंवा तीन महिन्यांमध्ये consistent profit मिळवू शकत नाही, तर आपण सुरुवातीला मोठ्या रक्कमांमध्ये पैसे का गुंतवावे? याला मूर्खपनाच म्हणावा.

ट्रेडिंग हा एक बिझनेस आहे. त्यासाठी तुम्हाला प्रत्येक पायरी चढावी लागेल, प्रत्येक अनुभव स्वतः घेत जाऊनच यश मिळवता येईल. योग्य मार्गदर्शन किंवा गुरु (MENTOR) मिळाले तर हे शिकण्याची प्रक्रिया अधिक जलद होईल आणि शिकण्यासाठी आपली TRADING UNIVERSE ACADEMY एक उत्तम मार्ग आहे. आता आपण या पुस्तकाच्या प्रमुख मुद्दयाकडे वळूया. जो की आहे २० ट्रेड्स ट्रेडिंग चॅलेंज. (20 TRADES TRADING CHALLANGE)

20 Trades Trading Challenge म्हणजे काय ?

जे लोक ट्रेडिंगसाठी काही प्रमाणात सज्ज आहेत, त्यांना या चॅलेंजमध्ये दिलेले मुद्दे समजतील. पण जर तुम्ही पूर्णपणे नवीन असाल, तर तुम्हाला ट्रेडिंग कसे करतात हे व्यवस्थित शिकून घ्यावं लागेल. या चॅलेंजमध्ये तुमच्याकडे २० ट्रेड्स पूर्ण करण्याचा टास्क आहे, पण ते पूर्ण करण्यासाठी तुमच्याकडे एक व्यवस्थित नियोजन आणि प्लान असावा लागेल. पण तो प्लान काय आणि चॅलेंज केल्याचे फायदे काय?

सध्याच्या सोशल मीडियाच्या जमान्यात, ट्रेडिंग शिकत असताना आपण खूप लोकांना फॉलो करतो किंवा त्यांच्याकडून शिकतो. पण आपल्याला एक भ्रम असतो की, जेव्हा आपण खूप वेळ मार्केटमध्ये शिकण्यात घालवतो, तेव्हा एक दिवस आपण एक यशस्वी, प्रॉफिटेबल ट्रेडर बनू. पण या प्रश्नाचे उत्तर तुमच्या कामाची दिशा आणि प्रयत्नांवर अवलंबून आहे.

जर तुम्ही चुकीच्या मार्गावर चालत असाल, तर तो "success" चा दिवस कधीच येणार नाही. मात्र, जर तुम्ही योग्य ठिकाणी मेहनत घेतली तर तुमच्या ट्रेडिंग कौशल्यात लवकर सुधारणा होईल, आणि योग्य खोडावरती घाव घालण्यासाठी म्हणजेच आपल्या चुका अचूक शोधून त्यावरती योग्य उपाय करण्यासाठी हे चॅलेंज तुम्हाला खूप मदत करेल.
हे चॅलेंज पूर्ण केल्यानंतर तुम्हाला कोणालाही सतत फॉलो करायची गरज लागणार नाही. तुमचं नक्की काय चुकतंय आणि प्रगती करायला काय गरजेचे आहे याचे उत्तर तुम्हाला स्वतःला मिळून जाईल आणि मग ज्या गोष्टींमध्ये आपण मागे आहोत त्यासाठी तुम्ही स्वतः काम करू शकता किंवा जलद प्रगती हवी असेल तर योग्य, विश्वासू आणि अनुभवी लोकांचे मार्गदर्शन घ्या. हे पुस्तक म्हणजे त्याच एका योग्य मार्गदर्शनाचा भाग आहे.

हे ट्रेडिंग चॅलेंज पूर्ण करण्याची सविस्तर महिती पुढे सांगितलेली आहे पण त्याआधी एक अट आहे की इथून पुढची महिती वाचताना तुमचे मन एकाग्र पाहिजे, आणि एकदा वाचायला सुरुवात केली की तुम्हाला हे पुस्तक वाचून पूर्ण करावे लागेल.

या ट्रेडिंग चॅलेंजद्वारे आपल्याला आपल्या प्रत्येक ट्रेड ची सखोल महिती त्याचबरोबर आपल्यामध्ये लपलेले ट्रेडिंग बद्दलचे सकारात्मक आणि नकारात्मक पैलू समजतील. हे ट्रेडिंग चॅलेंज पूर्ण करणे हा तुमच्यासाठी एक टास्क आहे आणि यामध्ये आपण करणारा प्रत्येक ट्रेड एक एक्सेल शीट मध्ये एका विशिष्टरित्या मांडणार आहोत.

या चॅलेंजचे ३ नियम आहेत.

१. एका दिवसात २ पेक्षा जास्त ट्रेड करायचे नाहीत.

२. प्रत्येक ट्रेड ला जवळपास एकसारखी रिस्क घ्या. म्हणजे पहिल्या ट्रेड ला १०० रुपये आणि दुसऱ्या ट्रेड ला ८०० रुपये असा रिस्क मध्ये फरक नको.

३ . ट्रेड घेतला की लगेच जो स्टॉप लॉस असेल तो तुमच्या अकाऊंट मध्ये लाऊन ठेवायचा आहे.

हे ३ सोपे नियम न मोडता काम करायचं आहे.

खाली एक डेमो एक्सेल शीट आहे, जी तुम्हाला तुमचा ट्रेडिंग डेटा व्यवस्थित ठेवायला मदत करेल. तुम्ही तुमच्या ट्रेडिंगला नियमितपणे ट्रॅक करू शकता आणि यानुसार पूढे सुधारणा कशी करायची हे समजू शकाल.

तुम्हाला एक्सेल शीटमध्ये काय भरायचं आहे ?

- SR.NO: १ ते २० या अंकांची यादी करा.
- DATE & DAY : प्रत्येक ट्रेडसाठी तारीख व वार लिहा.
- INSTRUMENT: ट्रेड केलेल्या इन्स्ट्रुमेंटचे नाव लिहा. (उदाहरणार्थ: HDFC Bank, Nifty 24000 PE short इत्यादि)
- ENTRY TIME: ट्रेड घेतानाची वेळ.
- EXIT TIME: ट्रेड संपवतानाची वेळ लिहा.
- EXPECTED RISK/REWARD: ट्रेड घेत असताना तुम्हाला अपेक्षित असलेला रिस्क/रिवॉर्ड रेशिओ.
- ACTUAL RISK/REWARD: ट्रेड एक्झिट करताना खरा मिळालेला रिस्क/ रिवॉर्ड रेशिओ.
- P&L (PROFT & LOSS): तुमचे प्रॉफिट आणि लॉस.
- BROKERAGE: प्रत्येक ट्रेड ला किती ब्रोकरेज आणि टॅक्स गेला हे लिहा.
- HOLDING MINUTES: ट्रेड पूर्ण होण्यासाठी किती वेळ गेला हे मिनिटांमद्धे लिहा (तासांमध्ये नको)
- COMMENT: ट्रेडसंबंधी विचार किंवा निरीक्षणे.
- TREND : तुम्ही ट्रेड केलेल्या स्टॉक किंवा इंडेक्स चा त्या दिवशी ट्रेंड कोणता होता.
- RATE YOUR TRADE: ट्रेड पूर्ण झाल्यानंतर स्वतःला त्या ट्रेड संबंधी १० पैकी रेटिंग द्या.

आशा प्रकारे एक एक्सेल शीट तयार करा. एक डेमो एक्सेल शीट खाली दिलेली आहे.

या एक्सेल मधील प्रत्येक कॉलमला एक विशिष्ट महत्व आहे आणि याद्वारे आपण आपल्या ट्रेडिंग सायकॉलजी मध्ये आमुलाग्र बदल घडवू शकतो.

तुम्हाला हे पाहून असे वाटेल की हा सर्व डेटा आपल्या ब्रोकर च्या स्टेटमेंट मध्ये सुद्धा दिसेल तर तसे नाही इथं आपण खूप विचारपूर्वक सर्व गोष्टी मानसिक दृष्टिकोनातून मांडलेल्या आहेत.
आता या एक्सेल मधील प्रत्येक मुद्द्याचं मी मानसिक दृष्टिकोनातून व्यवस्थित विश्लेषण करतो, मन लाऊन वाचा आणि समजून घ्या

कॉलम २. Date : तारीख टाकल्यामुळे जर तुम्हाला परत काही दिवसांनी त्या ट्रेड चा अभ्यास करायचा असेल तर मदत होईल व तारखेमुळे आपल्याला शेवटी हे पण समजेल की एका दिवसात आणि महिन्यात आपण किती ट्रेड करत आहोत.

कॉलम ३. Day : वार लिहिणे अतिशय महत्वाचे, जेव्हा तुम्ही हे चॅलेंज २० ट्रेड च्या पण पुढे घेऊन जाल तेव्हा तुम्हाला असं पाहायला मिळेल की उदा: सोमवारचे ट्रेड जास्तीत जास्त बरोबर गेलेले आहेत आणि बुधवारचे ट्रेड जास्तीत जास्त चुकलेले आहेत, आणि मग तुम्ही बुधवारच्या दिवशी काळजीपूर्वक ट्रेडिंग करू शकता किंवा आठवड्यातून एखादा दिवस सुट्टी घेतली तरी चालेल. आता ही महिती आपण एक्सेल मध्ये मांडली म्हणून समजली नाहीतर आपण रोज फक्त ट्रेडच करत राहिलो असतो आणि आपला ट्रेडिंग मधील स्वभाव समजला नसता.

कॉलम ४. Instrument : तुम्ही काही ट्रेड जेव्हा इक्विटी मार्केट मध्ये तर काही ऑप्शन्स मध्ये कराल तेव्हा त्यामध्ये जास्त अचूकता कोणत्या ठिकाणी आहे आणि कुठे ट्रेडिंग करायला सोप वाटतंय त्याचबरोबर कोणता सेगमेंट तुमच्यासाठी जास्त प्रॉफिटेबल आहे हे समजेल आणि मग तुम्ही तेच पुढे कंटिन्यू करू शकता.

कॉलम ५ आणि ६ : यामध्ये एन्ट्री टाइम आणि एक्झिट टाइम प्रत्येक ट्रेडसाठी दिलेले आहेत. आपल्याला एन्ट्री टाइमची माहिती पाहिजे कारण आपण सकाळी जे ट्रेड करतो त्यावेळी ट्रेड जास्त यशस्वी होतात की दुपारी हे आपल्याला यावरून समजेल.

जेव्हा आपण या एक्सेल शीटचा पुन्हा अभ्यास करू, तेव्हा सकाळी साडे नऊच्या आधीच अनेक ट्रेड घेतले असल्याचे दिसल्यास, आपण समजू शकतो की मार्केट सुरु होताच आपली घाई जास्त आहे. प्रत्येक व्यक्तीच्या चुका वेगवेगळ्या असतील, पण एक्सेल शीटमधून आपल्याला त्या लगेच समजून जाऊ शकतात. अशा प्रकारे रोजच्या ट्रेडिंगमध्ये जे काही चुकते, ते आपल्याला लगेच जाणवते, जे आपल्याला प्रत्यक्षात त्वरित लक्षात येत नाही.

कॉलम ७ आणि ८ : यामध्ये अपेक्षित रिस्क-रिवॉर्ड आणि वास्तविक रिस्क-रिवॉर्ड यांचा विश्लेषण केल्यावर हे स्पष्ट होईल की, ट्रेड घेताना आपण कशी तयारी करत आहोत. पण, जेव्हा ट्रेड संपतो, तेव्हा अपेक्षेपेक्षा जास्त रिस्क-रिवॉर्ड मिळतो का, किंवा आपण घाबरून आधीच एक्झिट करून आपल्या रिस्क-रिवॉर्डचे नुकसान करत आहोत, यामध्ये काहींना आपली मजबूत बाजू तर काहींना त्यांची कमकुवत बाजू लक्षात येईल जी की यशस्वी बनायला सगळ्यात मोठा अडथळा निर्माण करणारी असू शकते.

कॉलम ९ : इथे प्रत्येक ट्रेडचा नफा आणि तोटा याची माहिती लिहा. प्रत्येक ट्रेडमध्ये किती नफा किंवा तोटा झाला हे स्पष्ट करा आणि त्याला योग्य रंग द्या, जसे की खालील एक्सेल शीटमध्ये दाखवले आहे. जेव्हा लॉस होईल, तेव्हा त्याला लाल रंग न देता दुसऱ्या कोणत्याही रंगाने चिन्हांकित करा. त्याचबरोबर, २० ट्रेड्स पूर्ण करत असताना त्या सर्व ट्रेड्सचा एकूण नफा-तोटा खाली दाखवायला हवा.

२० ट्रेड पूर्ण केल्यावर, प्रत्येक ट्रेडचा नफा किंवा तोटा पाहिल्यावर, तुम्हाला हे स्पष्टपणे समजेल की तुमचा नफा जास्त आहे की तोटा. त्याचबरोबर, तुम्हाला तुमच्या सरासरी नफा आणि सरासरी तोटा याबद्दल सुद्धा माहिती मिळेल. काही लोकांना असे दिसेल की दहा ट्रेड पैकी सहा किंवा सात ट्रेड फायदेशीर आहेत, परंतु एक किंवा दोन लॉस प्रॉफिट पेक्षा जास्त आहेत, ज्यामुळे चांगला नफा मिळवता आलेला नाही.

यामध्ये सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे जेव्हा आपण दोन ते तीन दिवस सलग प्रॉफिट करतो त्यानंतर आपल्या मनामध्ये एकच विचार चालू असतो की आता आपल्याला लॉस होईल भरपूर दिवस प्रॉफिट झालेला आहे आता आपल्याला लॉस होऊ शकतो, तर हा विचार चुकीचा आहे तर जेव्हा तुम्ही एक्सेल शीट मध्ये तुमचा भरलेला डेटा पाहता तेव्हा तुम्हाला हे समजेल की असा पण एक काळ होता जिथे तुमचे १४ ट्रेड सलग बरोबर गेलेले आहेत.

त्यामुळे तुम्हाला परत सलग चार-पाच दिवस जरी प्रॉफिट झाला तरी पुढे लॉस होण्याचा नकारार्थी विचार तुमच्या डोक्यामध्ये येणार नाही आणि ट्रेडिंग करताना तुम्ही कॉन्फिडंट राहाल. यामध्ये सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे जेव्हा आपण दोन ते तीन दिवस सलग नफा कमवतो, तेव्हा आपल्या मनात एकच विचार येतो की आता आपल्याला तोटा होईल. खूप दिवस नफा झालाय, आता तोटा होऊ शकतो. परंतु हा विचार चुकीचा आहे.

जेव्हा तुम्ही एक्सेल शीटमध्ये तुमचा डेटा पाहता, तेव्हा तुम्हाला समजेल की एक असा काळही होता जिथे तुमचे १४ ट्रेड सलग यशस्वी झाले होते. त्यामुळे, जरी पुढे सलग चार-पाच दिवस नफा मिळाला तरी, तोट्याचा नकारात्मक विचार तुमच्या मनात येणार नाही, आणि ट्रेडिंग करताना तुम्ही अधिक आत्मविश्वासाने वागाल. त्याचबरोबर, जेव्हा तुम्ही २० पेक्षा अधिक ट्रेड्स तुमच्या एक्सेल शीटमध्ये भरता, तेव्हा तुम्हाला हेही स्पष्टपणे जाणवेल की, जरी सलग चार दिवस तोटा झाला तरी घाबरून जाण्याचं काही कारण नाही. कारण, मागील काळातही असे अनेकदा घडले आहे, आणि तरीही महिन्याच्या अखेरीस आपण नफ्यातच असतो. या अनुभवांमुळे आपल्याला स्वतःवर विश्वास निर्माण होतो आणि प्रॉफिट आणि लॉसच्या चक्रात आपला आत्मविश्वास डगमगत नाही. कारण, आपला डेटा आपल्यासमोर स्पष्ट आहे, आणि तो आपल्याला मार्गदर्शन करत असतो. (या ठिकाणी मी एक उदाहरण तुम्हाला सांगितलेलं आहे, प्रत्येकाच्या एक्सेल मध्ये हे आकडे पूर्णपणे वेगळे असतील)

अशा प्रकारे एक चांगला नफा मिळवणारा ट्रेडर बनण्यासाठी, १०० लोकांचे रोज ट्रेडिंग व्हिडिओ पाहत बसण्याची किंवा अनावश्यक गोष्टींचा अभ्यास करत बसण्याची गरज नाही. तुम्हाला फक्त तुमच्या ट्रेडिंगमध्ये होणाऱ्या छोट्या छोट्या चुका आणि तुमचे स्ट्रॉंग पॉइंट्स समजून त्यावर काम करायचं आहे. त्या दोन-तीन चुका सुधारून तुम्ही टॉप १% ट्रेडर्समध्ये स्थान मिळवू शकाल. (हे वाक्य वाचताना स्वतःमध्ये एक विश्वासाची भावना ठेऊन वाचा)

कॉलम १० : इथे ब्रोकरेज आणि चार्जेस यांचा तपशील आहे. आपल्याला प्रत्येक ट्रेडमध्ये किती ब्रोकरेज आणि चार्जेस गेले हे आपल्या ब्रोकरच्या प्रॉफिट अँड लॉस स्टेटमेंट किंवा कॉन्ट्रॅक्ट नोटमध्ये दिसते.

हे मांडणे अत्यंत महत्त्वाचे आहे, कारण यामुळे आपण प्रॉफिट किती कामावतोय आणि त्यामागे बाकीचे चार्जेस किती घालवतोय हे आपल्याला समजून घेतले पाहिजे. २० ट्रेड्सपैकी पहिले १० ट्रेड्स पूर्ण झाल्यानंतरच हे स्पष्ट होईल, आणि त्याचा उपाय मग तुम्ही शोधून काढाल. (सुरुवातीला छोट्या क्वांटिटीमध्ये ट्रेडिंग करत असताना चार्जेस थोडे जास्त जातात, त्यामध्ये काही हरकत नाही.)

कॉलम ११ : होल्डिंग मिनिट - माझ्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचा मुद्दा.

हे सर्व करत असताना आपण स्वतःला आणि आपल्या ट्रेडिंगच्या स्वभावाला नीट समजून घेत आहोत, आणि हेच अत्यंत महत्त्वाचे आहे. दुसऱ्याने दोन मिनिटांत ट्रेड संपवला, म्हणून आपला देखील त्याच वेळेत ट्रेड संपावा, असा काही नियम नाही. प्रत्येकाची ट्रेडिंग स्टाईल वेगळी असते.

तर, होल्डिंग मिनिट्स म्हणजे आपण एखादा ट्रेड किती मिनिटांसाठी चालवला, हा वेळ मिनिटांमध्ये नोंदवला जातो. आणि २० ट्रेड्सच्या शेवटी, त्यांचे सरासरी (AVERAGE) होल्डिंग टाईम देखील पाहता येते. एक्सेल शीट जेव्हा आपण बनवत असतो, तेव्हा त्याचा फॉर्म्युला देखील तसा सेट करा. (सर्व ट्रेड च्या होल्डिंग मिनिट्स ची सरासरी एक्सेल मध्ये खाली दिसली पाहिजे जसे की डेमो एक्सेल मध्ये दाखवलेले आहे.)

यामुळे आपल्याला आपला ट्रेडिंग डेटा अधिक स्पष्टपणे समजेल. उदाहरणार्थ, माझ्या एक्सेल शीटमध्ये एका ट्रेडचा सरासरी होल्डिंग टाईम ९१ मिनिटे आहे. म्हणजेच, मला एक ट्रेड पूर्ण करायला साधारणतः दीड तास लागतो.

आता, या माहितीच्या आधारे, मी कोणताही ट्रेड घेतल्यावर जर त्यात लगेच १० मिनिटांत टार्गेट पूर्ण झाले नाही, तर माझी घाबरून, गडबडून किंवा पॅनिक होऊन चुकीचा निर्णय घेण्याची शक्यता कमी होते. कारण मी पूर्वीच हे समजून घेतले आहे की माझ्या ट्रेडचा होल्डिंग टाईम कसा आहे. त्यामुळे दीड तास मी निवांत तो ट्रेड सांभाळू शकतो.

तर, ट्रेडिंग डेटा नोंदवताना, आपला एका ट्रेडचा वेळ समजून घेणे आवश्यक आहे, जेणेकरून आपण ट्रेड घेतल्यानंतर त्याच्या मॅनेजमेंट मध्ये काही चूक करणार नाही.

माझा एक ट्रेड पूर्ण होण्यासाठी जवळपास दीड तास जाऊ शकतो, म्हणूनच मी प्रत्येकाला सांगतो की, स्वतःला फॉलो करा, दुसऱ्यांना नाही. प्रत्येकजण वेगवेगळ्या पद्धतीने प्रॉफिट कमवतो आहे. तुमची पद्धत काय आहे? दुसऱ्याची कॉपी करून किती लांब जाऊ शकता? स्वतःला समजून घेणं खूप महत्त्वाचं आहे, आणि यासाठीच आपला सेल्फ ट्रेडिंग डेटा ऍनालिसिस आवश्यक आहे. हेच स्मार्ट वर्क आहे, जे ट्रेडिंगमध्ये हार्ड वर्क पेक्षा शेकडो पटीने महत्त्वाचं आहे.

तुमच्याकडे स्वतःचा अभ्यास नसल्यास, तुम्ही सतत गोंधललेले असता, आणि ट्रेडिंगबद्दल जे काही तुम्हाला माहीत आहे, ते वेगवेगळ्या अवघड भाषांमध्ये परत परत शिकत बसता. मग तुम्हाला असं वाटतं की शेअर मार्केट मध्ये मेहनत करून फळ मिळत नाही, पण ही मेहनत फक्त हार्ड वर्क आहे आणि ती देखील चुकीच्या मार्गावर.
तुमच्या आशा भरपूर समस्या मी रोज तुमच्या व्हॉट्सॲप मेसेज आणि कॉलवरती पाहतो. आणि मग त्याचसाठी माझ्या पद्धतीने, या पुस्तकाद्वारे तुम्हाला जी माहिती देऊ शकतो, ती देण्याचा हा माझा प्रयत्न आहे.

कॉलम १२ : यामध्ये त्या ट्रेडबद्दल आणि तुमच्या ट्रेड मॅनेजमेंटबद्दल तुम्हाला जे काही विचार किंवा अनुभव आहेत ते लिहा.

कॉलम १३ : इथे तुम्ही ज्या स्टॉक किंवा इंडेक्स चा ट्रेड घेतला आहे, त्याचा ट्रेंड काय होता हे लिहा. उदाहरणार्थ, बुलिश, वीक बियरिश, साईडवेज, इत्यादी. यावरून तुम्हाला हे समजेल की तुमचे ट्रेड ट्रेंडच्या दिशेने घेतलेले असतील तर जास्त बरोबर येतात की ट्रेंडच्या विरोधात. या सर्व गोष्टी तुम्हाला तुमचा स्वतःचा एक उच्च दर्जाचा ट्रेडिंग प्लान आणि ट्रेडिंग स्ट्रॅटेजी तयार करण्यात मोठी मदत करतील. आणि खरंतर, या एक्सेलमधील डेटाशिवाय तुम्ही स्वतःसाठी एक परफेक्ट ट्रेडिंग प्लान किंवा स्ट्रॅटेजी बनवूच शकत नाही. आता बरेच लोक असे मानतात की स्ट्रॅटेजी म्हणजे फक्त कुठे खरेदी आणि विक्री करायचं, पण त्या स्ट्रॅटेजीमध्ये यापेक्षापण खूप जास्त गोष्टींचा समावेश असतो.

कॉलम १४ : प्रत्येक ट्रेड पूर्ण झाल्यावर त्या ट्रेडमध्ये तुम्ही कसे वागलात, नियम पाळले की मोडले, ट्रेड मॅनेजमेंट आणि बिझनेस मॅनेजमेंट फॉलो केले की नाही यावरून स्वतःला रेट करा. उदाहरणार्थ, दहा पैकी आठ किंवा दहा पैकी शून्य.

जर तुम्ही तुमचं काम प्रामाणिकपणे, न चुकता पूर्ण केलं असेल, तर तुम्ही दहा पैकी दहा देऊ शकता. जेव्हा तुम्ही हे भरपूर ट्रेड केल्यानंतर परत एक्सेल शीट पहाल, तेव्हा तुम्हाला समजेल की अगोदरपेक्षा आताच्या ट्रेडला आपण जास्त रेटिंग देतोय.

यामध्येच तुमच्या ग्रोथ किंवा प्रगतीचं लक्षण आहे. प्रत्येक ट्रेड पूर्ण केल्यानंतर तुम्हाला वरती सांगितलेल्या गोष्टींचा अंदाज येईल. परंतु ही एक्सेल शीट कधीही बंद करू नका. जसे जास्तीत जास्त ट्रेड्स तुम्ही यामध्ये भराल, तसा तुमचा सेल्फ ट्रेडिंग डेटा तुमच्या ट्रेडिंग मधील स्वभावाला अचूक ओळखेल.

20 TRADES TRADING CHALLENGE (DEMO)

SR.NO	DATE	DAY	INSTRUMENT	ENTRY TIME	EXIT TIME	EXP. R: R	ACT. R: R	P&L	BROKRAGE	HOLDING MINUTES	COMMENT	TREND	RATE YOUR TRADE
1	1-Jan-25	MONDAY	INFOSYS SHORT	11:53	3:13	1,2.5	1:01	780	158	200	2ND PULLBACK	BULLISH,	7
2	2-Jan-25	TUESDAY	NIFTY 23400CE SHORT	9:51	12:24	1:02	01:01.9	2740	250	135	WIDE SL	WEAK BEARISH	9
3	4-Jan-25	THURSDAY	SBIN SHORT	10:10	10:11	1:03	SL	-1275	120	1	MKT TRAPPED PEOPLE TWICE	STRONG BEARISH	8
4	4-Jan-25	THURSDAY	TATAMOT LONG	2:16	3:07	1:03	SL	-1100	200	51	WITHOUT CONFIRMATION ENTRY	STRONG BEARISH	6
5	5-Jan	FRIDAY	NIFTY 23250CE LONG	10:20	11:40	1:02	01:01.5	2360	70	80	EXECUTION FAULT AT EXIT	BULLISH	8
6	9-Jan	TUESDAY	HDFCBK SHORT	11:45	12:55	01:02.5	T SL	-780	170	70	WRONG TARGET	SIDEWAYS	5
7													
8													
9													
10													
11			अशा प्रकारे तुम्ही करणाऱ्या प्रत्येक ट्रेड ची माहिती इथे भरा.										
12													
13													
14													
15													
16													
17													
18													
19													
20													
								2725	968	89.5			

जेव्हा या चॅलेंजला एक वर्ष पूर्ण होईल, तेव्हाच तुम्ही ही एक्सेल शीट बंद करून दुसरी सुरू करू शकता. पहिले २० ट्रेड हे फक्त आपल्याला या गोष्टींचे महत्व समजण्यासाठी आहेत. त्यानंतर तुम्हाला माझ्या कडून कोणतेही मार्गदर्शन घेण्याची आवश्यकता राहणार नाही. तुम्ही स्वतःचे निर्णय घेऊन योग्य रस्ता निवडू शकता. वरील एक्सेल जर तुम्ही पहिल्यांदा तयार करत असाल, तर त्यात तुमचे सर्व ट्रेड्स कायम न चुकता भरत राहायचे आहे. तुम्ही वेगवेगळ्या सेगमेंटसाठी वेगवेगळ्या एक्सेल शीट्स तयार करू शकता, उदाहरणार्थ इक्विटी ट्रेडिंगसाठी एक, ऑप्शन्स ट्रेडिंगसाठी एक, आणि सेलिंगसाठी एक. यामध्ये तुम्हाला तुमच्या आयडिया वापरून आणखी इनोवेशन करण्याची संधी मिळेल. परंतु, या एक्सेल शीटमध्ये कोणतेही अत्यधिक रंग किंवा गर्दी टाळा. जितके साधे आणि सुटसुटीत ठेवता येईल, तितके ते अधिक प्रभावी ठरेल.

वर उल्लेख केलेली माहिती खूप खोल आहे, जी सर्वांसाठी पूर्णपणे समजणं कठीण होऊ शकतं. पण जर तुम्ही हे समजून घेतलं आणि आत्मसात केलं, तर ट्रेडिंगमध्ये तुमचं योग्य मार्गदर्शन करणारे तुम्ही स्वतः असाल. हे काम दोन दिवसात होणारं नाही, त्यासाठी वेळ लागेल, पण योग्य मार्गावर असाल, तर यश नक्कीच तुमचं होईल. मी या माहितीचं महत्त्व ओळखतो आणि तुम्हालाही ते कळेल. दर महिन्यात किमान एकदातरी हे पुस्तक वाचा, आणि हळूहळू जसे तुम्हाला अनुभव येतील, तसं तुम्हाला या माहितीतील एक-एक सीक्रेट समजायला सुरू होईल. आणि मग खऱ्या ट्रेडिंग ची मजा येईल.

हे पुस्तक एकदा वाचूनच शेअर मार्केट ट्रेडिंगच्या सखोल ज्ञानाचा पूर्णतः समज होईल, असे नाही. फक्त अनुभवी ट्रेडर्सच हे पूर्णपणे समजू शकतात. जे नवीन आहेत, त्यांना हळूहळू अनुभव घेत घेत ह्या ज्ञानाचा अर्थ समजेल.

शेअर मार्केट ट्रेडिंगच्या या व्यवसायात पाऊल टाकताना, योग्य मार्गदर्शन मिळाल्यास त्यापेक्षा चांगली गोष्ट काय? म्हणूनच, हे पुस्तक माझ्याकडून तुमच्यासाठी एक छोटं मार्गदर्शन आहे. तुमच्याकडे आपल्या ट्रेडिंग युनिव्हर्सचा व्हाट्सॲप नंबर आहे. या विषयावर अभ्यास करत असताना, जर तुम्हाला काही अडचण आली, तर निश्चिंतपणे तुमचे प्रश्न पाठवू शकता. मी आणि माझी टीम शक्य तितकी मदत करण्याचा पुरेपूर प्रयत्न करू.

त्याचबरोबर जर तुम्ही स्टॉक मार्केटच्या क्षेत्रात नवीन असाल किंवा याबाबत कमी ज्ञान असलं तरीही, चिंता करण्याची गरज नाही, आपल्या "Trading Universe" चा लाईव मेंटरशिप प्रोग्राम मध्ये तुम्ही सहभाग घेऊ शकता.

हा प्रोग्राम तुम्हाला स्टॉक मार्केटच्या गतीशील जगात विश्वासाने प्रवेश करण्यासाठी आवश्यक असलेले सर्व साधन आणि मार्गदर्शन प्रदान करेल.

अशाप्रकारे, ज्ञानाची सुरूवात घेऊन तुमचं भवितव्य बदलण्याची वेळ आली आहे. प्रत्येक पुस्तक १०० २०० पानांचं असावं असा काही नियम नाही, पण त्या पुस्तकात माहिती किती महत्त्वपूर्ण आहे आणि त्यामुळे आपल्या आयुष्यामध्ये किती बदल होऊ शकतो याला जास्त महत्त्व आहे.

मागील काही वर्षांच्या ट्रेडिंग मधील अनुभवांचे विचार :

जेव्हा तुम्ही हे मन लाऊन वाचाल तेव्हा तुम्हाला याचा खोल अर्थ समजेल.

यशाचा मार्ग कधीच सोप्पा नसतो.
ट्रेडिंगमध्ये यश मिळवणे सोपे नाही, परंतु हे शक्य आहे. ज्या प्रमाणे कोणतीही महानता साधताना अनेक अडचणी येतात, तसाच ट्रेडिंगमध्येही प्रत्येक चूक शिकवण देते. त्या चुका तुमचं मार्गदर्शन करतात. यशाच्या मार्गावर चुकणे हा एक भाग आहे, त्याला अडथळा मानू नका.

ट्रेडिंग म्हणजे धैर्य आणि आत्मविश्वासाचा खेळ आहे.
हे खरे आहे की मार्केट नेहमीच अनिश्चित असते, आणि ज्या वेळी आपल्याला आपल्या निर्णयावर विश्वास नसेल, तेव्हा मन शांत ठेवा. आत्मविश्वासाच्या आधारावरच आपले योग्य निर्णय घेता येतात. हे कधीच विसरू नका की, आपले निर्णय आणि धैर्य हेच तुम्हाला यशाच्या दिशेने नेतील.

प्रगती म्हणजे छोट्या-छोट्या सुधारणा.
प्रत्येक ट्रेडिंग जर्नी लांब असते, आणि प्रगती केवळ मोठ्या प्रॉफिट्समध्ये नाही, तर आपल्या चुका ओळखून त्या सुधारण्यात असते. आपण दररोज थोड्या-थोड्या सुधारणा करत राहिले, तर एक दिवस तुमचा मार्ग पूर्णपणे बदललेला असेल.

स्मार्ट वर्क हेच खरे काम आहे.
आपल्या कष्टांचे फळ मिळवण्यासाठी मेहनत तर आवश्यक आहेच, पण त्यासोबतच त्या मेहनतीत एक स्मार्टनेस आणणे अत्यंत महत्त्वाचे आहे. आपला वेळ आणि ऊर्जा योग्य ठिकाणी गुंतवणे म्हणजेच स्मार्ट वर्क.

जेव्हा तुम्ही योग्य पद्धतीने आणि चांगल्या नियोजनाने ट्रेडिंग करत असता, तेव्हा तुम्ही अधिक रिजल्ट मिळवू शकता.

दुसऱ्यांच्या यशावर जाऊ नका, आपला मार्ग स्वतः तयार करा, ट्रेडर्स तर भरपूर आहेत पण प्रत्येकाचे मार्ग वेगळे असतात. त्यासाठी आपल्याला फक्त आपल्या अनुभवावर विश्वास ठेवावा लागतो. जेव्हा तुम्ही इतरांच्या यशाने प्रेरित होऊन आपला मार्ग शोधता, तेव्हा तुम्हाला आपली खरी क्षमता समजते.

प्रत्येक दिवस एक नवा आरंभ आहे.
एक दिवस तुमचं ट्रेडिंग चुकत असेल, परंतु दुसऱ्या दिवशी तुम्हाला त्यातून शिकायला मिळेल. नवा दिवस एक नवी संधी, नवी सुरुवात असते, त्याला फक्त विचार करण्यातच घालवू नका निर्णय घ्या जो तुम्हाला एक पाऊल पुढे नेऊ शकतो. तुमचं यश तुमच्याच हातात आहे.

आपण काय करतो हे महत्त्वाचे नाही, पण त्या कार्याबद्दल आपण किती प्रेम करत आहोत हे महत्त्वाचे आहे.
जर ट्रेडिंगमध्ये तुम्हाला खरंच आवड असेल, तर तुमचं काम कोणत्याही इतर कामापेक्षा वेगळं असणार नाही. ट्रेडिंग ही एक कला आहे, जी फक्त पैशांसाठी न शिकता प्रेमाने शिकली पाहिजे. जर तुम्हाला यामध्ये खरी आवड असेल, तरच तुम्ही खूप पुढे जाऊ शकता.

सकारात्मकता तुमचं जीवन बदलू शकते.
आत्तापर्यंत मी वाचलेल्या जवळपास सर्व बेस्ट सेलर पुस्तकांमध्ये याचा उल्लेख आहे की सकारात्मक विचार आणि मानसिकता तुम्हाला प्रत्येक अडचणीतून मार्ग काढायला मदत करतील. ट्रेडिंगमध्ये तुमचं मानसिक संतुलन महत्त्वाचं आहे. त्यामुळे जेव्हा परिस्थिती कठीण असेल, तेव्हा तुमचं सकारात्मक दृष्टिकोनच तुमचं मार्गदर्शन करेल.

परफेक्शनची मागणी करू नका, पुढे येणारे प्रत्येक लहान यश स्वीकारा.
सर्वांना हीच अपेक्षा असते की मी सुरुवातीपासूनच आपल्या क्षेत्रामध्ये षटकार मारले पाहिजेत परंतु सुरुवात ही कायम थोड्या धीरानेच केली जाते. हळू हळू तुमचं प्रत्येक छोटं यश तुमचं मोठं यश होईल. त्यामुळे परफेक्शन किंवा मोठ्या यशाची वाट पाहू नका. तुमचं पुढे जाणं, तुमचं शिकणं आणि प्रत्येक यशाची आनंदाने स्वीकृती मिळवणं हेच महत्त्वाचं आहे.

ट्रेडिंग हा एक रोमांचक प्रवास आहे , पण जोपर्यंत तुम्ही त्यामध्ये टिकून राहता, जोपर्यंत तुम्ही शिकत राहता, तोपर्यंत तुम्ही यशस्वी होणारच. जर तुम्ही प्रत्येक दिवशी तुमचं १% सुधारित केलं, तर काही काळात तुम्ही नक्कीच एक यशस्वी प्रॉफिटेबल ट्रेडर असाल.

विश्वास ठेवा, तुम्हाला जिंकायचं आहे, तुम्ही ते करू शकता. तुमच्यात त्याची क्षमता आहे. यशाला वेळ लागेल, परंतु तो यशाचा क्षण नक्कीच येईल आणि तुमच्या या ट्रेडिंगमध्ये यशस्वी होण्याच्या प्रवासात तुमचे हे पुस्तक गेम चेंजर ठरवा.

तुम्हाला तुमच्या पुढील प्रवासास खूप खूप शुभेच्छा.
धन्यवाद.

- समाप्त -

TRADING UNIVERSE
ACADEMY

Contact Us

+91 7709182707

@trading_universe_27

tradinguniverse27@gmail.com